माहे एप्रिल-२०१९ मध्ये मुदती संपणाऱ्या
३ नगर परिषदांच्या अध्यक्ष /सदस्य
पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी
प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०१९

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र. रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.३/का.६

**निवडणूक प्राथम्य**
**ई-मेल**

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०१९.

प्रति,
जिल्हाधिकारी,
पालघर व बुलढाणा.

**विषय :-** पालघर, सिंदखेडराजा व लोणार या नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०१९ प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम.

संदर्भ :- १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.९/का-६,दि.१०/०१/२०१९ रोजीचे आदेश.
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१९/का-६, दि.२२/११/२०१८ रोजीचे पत्र.
३) आयोगाचे समक्रमांकाचे दि.११/०२/२०१९ रोजीचे पत्र व आदेश.
४) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश,२०१६.

महोदय,

आपल्या जिल्ह्यातील **पालघर, सिंदखेडराजा व लोणार** या ३ नगर परिषदांच्या सदस्य व अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना, आरक्षण व सोडत शासन राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द झालेली असून या नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी संदर्भाधिन अ.क्र. ३ येथील पत्रान्वये मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित कार्यक्रम विहित कालावधीत पार पाडण्याची कार्यवाही सुरु आहे.

२.	त्यानंतर आयोगाकडून संदर्भाधीन अ.क्र. १ येथील आदेशांन्वये परिशिष्ट-२ मधील नमूद ३ नगर परिषदांच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याकरिता पूर्वतयारीबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३.	राज्य शासनाने संदर्भाधीन अ.क्र. ४ येथील अध्यादेश प्रख्यापित केला असून त्यानुसार "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६ )", दिनांक १९/०५/२०१६ व दि.३०/०८/२०१६ अन्वये नगर परिषदांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे. तसेच दि.०४/१०/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अध्यक्ष पदाचे निवडणूक नियम, २०१६ शासन राजपत्रात प्रसिध्द केले असून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रावर कार्यवाही करावी.

४.	आता, या पत्रान्वये **पालघर, सिंदखेडराजा व लोणार या ३ नगर परिषदां**मधील सदस्य व अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. सार्वत्रिक निवडणुका असलेल्या नगर परिषदांचा तपशील परिशिष्ट-२ नुसार आहे.

५.	**निवडणुकीची आचारसंहिता** आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणूक असलेल्या संपूर्ण संबंधित नगर परिषद क्षेत्रामध्ये लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

६.	सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगर परिषदांच्या प्रभाग रचना व सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगर परिषदांच्या मतदार यादीसंदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये

मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द / स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

७. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक १०/०१/२०१९ च्या व इतर पत्रातील सूचनांनुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला, .

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

29/02/2019

(संजय सावंत)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, कोकण व अमरावती विभाग.
९) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक
१०) मुख्याधिकारी, पालघर, सिंदखेडराजा व लोणार यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.
११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.
१२) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील वकील, (मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद व नागपूर खंडपीठ)
१३) सहायक आयुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१४) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१५) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१६) निवड नस्ती (का.६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

## परिशिष्ट -१ (सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.३/का.६, दि. २१/०२/२०१९ सोबतचे सहपत्र.)

मुदत संपणाऱ्या पालघर, सिंदखेडराजा व लोणार या ३ नगर परिषदांच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०१९.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | २५/०२/२०१८ (सोमवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | २८/०२/२०१९ (गुरुवार) सकाळी ११.०० ते ०७/०३/२०१९ (गुरुवार) दुपारी ०२.०० पर्यंत |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | २८/०२/२०१९ (गुरुवार) ते ०७/०३/२०१९ (गुरुवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत)<br>रविवार दि.०३/०३/२०१९ व सोमवार दि.०४/०३/२०१९ या सुट्टींच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०८/०३/२०१९ (शुक्रवार)<br>सकाळी ११.०० वाजल्यापासुन |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक<br>**अपील नसेल तेथे** | १३/०३/२०१९ (बुधवार)<br>दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ५-अ | अपील असल्यास<br>(i) वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.<br>(ii) निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २४/०३/२०१९ (रविवार)<br>सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २५/०३/२०१९ (सोमवार)<br>सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ९ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | कलम १९ आणि ५१-अ-१अ (९) मधील तरतुदींनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

21/02/2019

(संजय सावंत)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Users\kesharsing.sulane\Desktop\नांदेड-वाघाळा मनपा.docx

# नगरपरिषदांची नावे

## परिशिष्ट - २ (सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.३/का-६, दि. २१/०२/२०१९ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगरपरिषदांची नावे | मुदत समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पालघर | पालघर | १८/०४/२०१९ |
| २ | बुलढाणा | सिंदखेडराजा | ०६/०४/२०१९ |
| | | लोणार | ०६/०४/२०१९ |
| | एकूण | ३ | |